<u>नियमित दिवाणी कज्जा नं.१६७/२००९ मधील नि.क्र.९१ खालील आदेश</u>
<u>(पारित दिनांक-१८/०६/२०२२)</u>

श्रीमती सरस्वती सतीश बेडक्याळे **विरुध्द** श्री. महादेव रामचंद्र बेडक्याळे.

**CNR - MHKO130007162009**

०१. प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावरती दाखल करण्यास झालेला विलंबामुळे दाव्याच्या कामी जो विलंब झालेला आहे तो माफ करुन मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. वादी यांच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र. १ हे मयत झाल्यानंतर दरम्यानच्या कालावधीमध्ये कोरोणा महामारीमुळे व लॉकडाऊनमुळे न्यायालयाचे कामकाज मर्यादीत स्वरुपात चालत असल्याने प्रतिवादीचे वारसांना विहीत कालावधीत अभिलेखावर घेता आले नाही. त्यामुळे, प्रस्तुतचा कामी जो विलंब झालेला आहे तो माफ करुन मिळणेकरीता सदर अर्ज दाखल केलेला आहे.

०३. सदरच्या अर्जास प्रतिवादीच्या वकीलांनी म्हणणे दाखल केले असून, सदर अर्ज हा खोटा व लबाडीचा असल्याने तो नामंजूर करावा असे म्हणणे त्यांनी दिलेले आहे.

०४. उभय बाजुच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. एकंदरीत अभिलेखाचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र. १ यांचा मृत्यू दि. १७/०७/२००१ रोजी झाला याबाबत कोणताही वाद नाही असे दिसून येते. त्याबाबत मृत्यु दाखला अभिलेखावर दाखल आहे. सन २०२०–२०२१ साली कोरोना महामारीमुळे न्यायालयाचे कामकाज मर्यादीत स्वरुपात चालत होते ही बाब स्पष्ट आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरीता दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे, मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावरती येणे गरजेचे आहे. तसे न झाल्यास दाव्याच्या कामी तांत्रिक त्रुटी राहू शकतात. त्यामुळे, सदर अर्जाच्या कामी झालेला विलंब रद्द करणे योग्य राहील. तथापि,

प्रस्तुत प्रकरणी वादीच्या विलंबामुळे दाव्याच्या कामी जो विलंब झाला आहे, त्या विलंबाकरीता वादीवर काही रक्कम खर्च म्हणून बसविणे योग्य राहील असे मला वाटते, वरील सर्व कारणांचा विचार करता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

- आ दे श -

१) अर्ज (निशाणी क्र. ९१) मंजूर करण्यात येतो.

२) वादीने प्रतिवादी यांना रक्कम रुपये २००/- ही आज तारखेपासून ७ दिवसांच्या आत खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर प्रतिवादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

Amol Bharat Jawale
Digitally signed by Amol Bharat Jawale
Date: 2022.06.20 17:53:11 +0530

कागल (**अमोल भारत जवळे**)

दिनांकः– १८/०६/२०२२ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

कागल.